स.के.नं.७१२/२०२५
नि.क्र.९/क च्या पुढे

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ७ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | झुनझुन साहेब सदाय |
| वय | - | २४ वर्षे |
| व्यवसाय | - | स्वच्छता कर्मचारी |
| राहणार | - | सोनारी गांव, ता.उरण, जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे...**

१. घटनेच्या वेळी मी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीमध्ये कामाला होतो. ती कंपनी सीवुड जवळ आहे. त्यावेळी माझे सोबत अखीलेश्वर महतो व अनिल यादव हे कामाला होते. ते तेथे दुसऱ्या स्वरुपाचे काम करतात. माझे कामाची वेळ सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० अशी होती. घटनेच्या दिवशी दुपारी ३.०० ते रात्री ११.०० अशी ड्युटी होती. घटनेच्या दिवशी कामावर जाणेकरीता आमच्याकडे गाडी नसल्याने आम्ही गाडी पकडण्याकरीता चांदणी चौक येथे गेलो होतो. अखिलेश्वर महतो हा समोर होता व मी मागे होतो. त्यावेळी सिग्नल लाल असल्याने तो रस्ता क्रॉस करत होता.तेवढयात एक ट्रेलर वेगात आले व त्याला धडक दिली. त्यामुळे त्याच्या पायाला मार लागला. तो ट्रेलर जेएनपीटी कडून पनवेल कडे जात होता. मला त्या ट्रेलरचा क्रमांक आठवत नाही. तेथे असलेल्या पोलीसांनी अखिलेश्वर याला दवाखान्यात नेले व दुसऱ्या एका चार चाकी वाहनाने त्या ट्रेलरचा पाठलाग करुन समोर जाऊन पकडले. त्या घटनेत ट्रेलर वाल्याची चुकी होती.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. जितेंद्र कातरणे यांचेद्वारे**

२. हे म्हणणे खरे आहे की, अखिलेश्वर महतो हा माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, चांदणी चौकात येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची बरीच वरदळ असते. हे

म्हणणे खरे नाही की, तेथे स्पीडब्रेकर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे रस्ता थोडा खराब आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे झेब्रा क्रॉसिंग नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला कामावर जाण्यासाठी उशीर झाल्याने आम्ही घाई घाईने जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी गाडी न आल्याने अखिलेश्वर गाडी पकडण्यासाठी घाई करत होता. हे म्हणणे खरे आहे की, अखिलेश्वर हा शिक्षीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी जेएनपीटी कडून पनवेल कडे जाण्यासाठी हिरवा सिग्नल होता. हे म्हणणे खरे नाही की, अखिलेश्वर महतो घाई घाईने रस्ता क्रॉस करत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या ट्रेलर चालकाने हॉर्न देवुन देखील अखिलेश्वर रस्त्याच्या मध्ये राहिल्याने अपघात झाला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अखिलेश्वर माझा मित्र असल्याने मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ट्रेलर चालकाने अखिलेश्वर याला धडक दिल्याचे व त्यामुळे अखिलेश्वरच्या पायाला मार लागल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)

उरण,
दिनांक –२७/०२/२०२६